<u>नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.</u>

दिनांक 26.11.2018 रोजी दुपारी 03.00 वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री अब्दुल शमीम अब्दुल्ला साब, सभापती**

<u>सर्वश्री</u>

| | |
|---|---|
| अ. सत्तार अ. गफुर | चव्हाण आनंद शंकरराव |
| पवळे उमेश देवराव | खान म. मसुद अहेमद खान उस्मान खान |
| खान फारुख अली इलीयात खान | स. शेर अली अ. महेबुब अली |
| देशमुख सतिश पुंडलीकराव | येवनकर मोहीनी विजय |
| तिडके प्रशांत विठ्ठल | अ.लतीफ अ. मजीद |
| रावत भानुसिंह गयादनसिंह | मुथा कांताबाई प्रकाशचंद |
| नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ | गोडबोले ज्योत्सना राजु |

**सभापती** — उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य व उपआयुक्त प्रशासन तथा प्राधिकृत अधिकारी श्रीमती गिता ठाकरे, मुख्यलेखाधिकारी श्री कंदेवाड, प्रभारी मुख्य लेखा परिक्षक श्रीमती मुंढे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**स. शेर अली** — रिलायन्स कंपनीच्या संदर्भात उपसमितीचा अहवाल मागील 25 तारखेला देण्यास सांगीतले होते तो अहवाल आतापर्यंत सादर करण्यात आला नाही.

**मुख्य लेखाधिकारी** — उप समितीचा अहवाल सादर करण्यास मला आदेश अथवा इतीवृत प्राप्त झालेले नाही. त्यामुळे सदरचा अहवाल सादर करता आला नाही.

**स. शेर अली** — रिलायन्स कंपनीने केबल टाकण्याचे काम मन्यार गल्लीमध्ये रात्री चालू होते त्याचे फोटो काढले आहे. उप समितीची बैठकीत निर्णय होवून सुध्दा काम राहत असेल तर त्याला कोण जबाबदार आहे.

**भानुसिंह रावत** — श्री कंदेवार यांना उप समितीचा निर्णय झाल्यानंतर का कॉपी देण्यात आली नाही. जाणीव पुर्वक आदेश दिले नाही काय याचा खुलासा करावा.

**स. शेर अली** — स्थायी समितीने निर्णय घेतला आहे तो निर्णय होवून देखील अमंलबजावणी करण्यात आली नाही त्यासाठी हक्कभंग केला आहे. संबधीतावर हक्क भंगाची कार्यवाही करण्यात यावी. काम चालू असल्याचे फोटो नगरसचिव, मुख्य लेखाधिकारी व कार्यकारी अभियंता सांबावि यांना पाठवले आहेत.

**फारुख अली खान** — नगरसेवक पत्र व्यवहार करुन माहिती मागवित असतात. त्यांना माहिती का देण्यात येत नाही याचा खुलासा करावा. आकृतीबंधाची माहिती उपलब्ध करुन देण्यात येत नाही. सभापती साहेब आपले एकही काम यशस्वी झालेले नाही असे मला वाटते. रिलायन्स कंपनीचे केबल टाकण्याचे काम थांबले नाही.

**मालमता व्यवस्थापक** — मालमत्ता विभागाकडे केबल टाकण्यासाठी ती संचिका सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आलेल्या होत्या. त्यात माझ्या विभागामार्फत महासभा ही सक्षम प्राधिकरण आहे. महासभेची परवानगी घेतल्याशिवाय कोणत्याही प्रकारची परवानगी देण्यात येवू नये असा अहवाल दिलेला आहे.

**स. शेर अली** — महासभेची परवानगी घेतली नाही त्यामुळे त्यांनी हक्कभंग केला आहे त्यामुळे त्यांच्यावर हक्क भंगाची कार्यवाही करण्यात यावी. ज्यानी कोणी स्थायी समिती व सर्व साधारण सभे अधिकाराचा भंग केला असेल त्याच्यावर कार्यावाही करण्यात यावी. हक्क भंगाच्या प्रस्तावास सर्व सभागृहास विनंती आहे हा प्रस्ताव पास करण्यात यावा.

दिनांक 07.09.2018 रोजी आयोजीत करण्यात आलेली मनपाकेच्या स्थायी समितीच्या सभेत ठराव क्रमांक 61 नुसार रिलायन्स कंपनी मार्फत शहरातील रस्त्यांचे खोदकाम करुन केबल टाकण्याचे काम मनपाकेच्या स्थायी समितीची सभा अथवा सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता चालु असल्यामुळे सदरचे काम कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तात्काळ थांबविण्यात यावा म्हणुन ठराव पारीत करण्यात आला होता. तथापि सदरील रिलायन्स कंपनी यांनी शहरातील रस्त्याचे खोदकाम करुन केबल टाकण्याचे काम चालु असल्याचे निदर्शनास आणुन दिलेले असल्यामुळे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कामावर नियंत्रण नाही व स्थायी समितीने दिलेल्या निर्देशानुसार अमलबजावणी करीत नसल्याचे सिध्द होत असल्याने

संबंधीत अधिका-यांवर हक्कभंग प्रस्ताव स. सदस्यांनी सादर केला असुन तो प्रस्ताव मंजुर करुन संबंधीत अधिकारी हे स्थायी समितीचे निर्देशावर अमलबजावणी करीत नसल्यामुळे त्यांच्यावर तात्काळ नियमानुसार कार्यवाही करणे व रिलायन्स कंपनीचे काम तात्काळ बंद करण्यास

**अब्दुल सत्तार** हक्क भंगाच्या प्रस्तावास माझे अनुमोदन आहे. नगरसचिवांने जो अहवाल दिला त्याच्यावर कार्यवाही झाली पाहीजे.

**सभापती** श्री स. शेर अली यांनी जो हक्कभंग प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 87** **ठराव**

दिनांक 07.09.2018 रोजी आयोजीत करण्यात आलेली मनपाकेच्या स्थायी समितीच्या सभेत ठराव क्रमांक 61 नुसार रिलायन्स कंपनी मार्फत शहरातील रस्त्यांचे खोदकाम करुन केबल टाकण्याचे काम मनपाकेच्या स्थायी समितीची सभा अथवा सर्वसाधारण सभेची मान्यता न घेता चालु असल्यामुळे सदरचे काम कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तात्काळ थांबविण्यात यावा म्हणुन ठराव पारीत करण्यात आला होता. तथापि सदरील रिलायन्स कंपनी यांनी शहरातील रस्त्याचे खोदकाम करुन केबल टाकण्याचे काम चालु असल्याचे निदर्शनास आणुन दिलेले असल्यामुळे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कामावर नियंत्रण नाही व स्थायी समितीने दिलेल्या निर्देशानुसार अमलबजावणी करीत नसल्याचे सिध्द होत असल्याने संबंधीत अधिका-यांवर हक्कभंग प्रस्ताव स. सदस्यांनी सादर केला असुन तो प्रस्ताव मंजुर करुन संबंधीत अधिकारी हे स्थायी समितीचे निर्देशावर अमलबजावणी करीत नसल्यामुळे त्यांच्यावर तात्काळ नियमानुसार कार्यवाही करणे व रिलायन्स कंपनीचे काम तात्काळ बंद करण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

सभापती हैदरबाग दवाखान्या येथे ऑपरेशनच्या वेळात जर विदयुत पुरवठा खंडीत झाला तर त्यावेळीच सुरु करण्याकरीता एक कर्मचारी त्या ठिकाणी ठेवण्यात यावा.

**अब्दुल सत्तार** यापुर्वी त्या ठिकाणी जो कर्मचारी होता त्याच कर्मचारी त्या ठिकाणी देण्यात यावा.

**प्राधिकृत अधिकारी** जो कर्मचारी त्या ठिकाणी देण्यात आला त्याला वर्क लोड हा अत्यंत कमी आहे केवळ लाईट गेला की तो जनरेटर चालू बंद करतो एवढेच त्याच्या कडे काम आहे म्हणुन त्या ठिकाणच्या कर्मचा-यांची पदस्थापना केली आहे. कोणाचेही ऐकुन बदली केलेली नाही. उप अभियंत्यास सुध्दा चौकशी करुनच बदली केली आहे. जेनरेटरला डीझल कीती आले किती डीझल वापरण्यात आले याची माहिती त्या संबधीत कर्मचारी यांनी दिली, म्हणुन त्याची पदस्थापना केली आहे.

**स. शेर अली** त्या संबधीत कर्मचारी यांचे कडून काम करुन घेण्याची जबाबदारी अधिका-याची आहे. एमआरसी ही दक्षता पथक मंजूरी देईल त्यावेळी काम करण्यात येईल. त्या ठिकाणी कर्मचारी देवू नका जर तीथे जिवीत हाणी झाली तर त्याची जबाबदारी आपण घेणार काय हे सांगावे.

**अब्दुल सत्तार** बिलाल नगरच्या रस्त्यावर एक खडडा आहे तो खडडा केव्हा बंद करणार आहात. मागील काही महीण्यापासुन एमआरसी काम करीत नाही आम्ही स्वत: पैसे टाकुन काम करुन घेत आहोत.

**अब्दुल सत्तार** एमआरसी ही झोन सी मध्येच नाही आजच्या सभेत हा प्रस्ताव सादर केला आहे. रोजंदारीवरील कर्मचारी योग्य पध्दतीने काम करीत नाहीत. जर त्यांना परमनट केले तर ते कसे काम करतील याचा प्रश्न आहे. आताच ते कंत्राटीवर असुन चांगले काम करीत नाही. कंत्राटी अभियंत्यास एमबी रेकॉडींगचे पावर देण्यात आलेले आहेत ते पावर काढून घेण्यात यावे. रोजंदारीवरील असल्याने त्यांचे आपण काय घ्यावे त्यासाठी ते पॉवर काढून घेण्यात यावे.

**म. मसुद अहेमद खान** श्री अ. सत्तार यांनी कंत्राटी अभियंत्यांना एम.बी. रिकॉर्ड करण्याचे पावर काढून घेण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** श्री अ. सत्ता यांनी कंत्राटी अभियंत्यांना एम.बी रिकॉर्ड करण्याचे पावार काढून घेण्याचा जो प्रसताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 88** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना मोजमाप पुस्तीका नोंदणी (M.B.Recording) करण्याचे अधिकार कोणत्या नियमानुसार अथवा शासन निर्णयानुसार देण्यात आले त्याचा अहवाल पुढील स्थायी समिती समोर सादर करण्यात यावा. तो पर्यंत मनपाकेतील कंत्राटी पध्दतीने एकत्रीत वेतनावरील कार्यरत असलेल्या उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांना मोजमाप पुस्तीका नोंदणी (M.B.Recording) करण्याचे अधिकार आज पासुन रद्द करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**फारुक अली खान** — मी जी आकृती बंधाची माहीती मागविली होती ती माहिती देण्यात आली नाही. आम्ही वेगळयाने कोणतीही माहिती मागविली नाही जी शासनास सादर केली त्याची प्रतची मागणी केली ती देण्यास का विलंब होत आहे याचा खुलासा करावा.

**स. शेर अली** — आम्ही जी आकृती बंधाची माहिती मागविली आहे,ती अदयाप पर्यंत देण्यात आलेली नाही त्यामुळे आम्हाला त्यात काही बाबी नोंद केल्या नाही असे आम्हाला वाटते. का गोपनीयता ठेवण्यात येत आहे. मला वाटते की ब-याच कर्मचारी यांच्यावर अन्याय होणार आहे. त्यासाठी यात एक समिती गठीत करावी. जी पदोन्नती देण्यात येत आहे. त्यात कर्मचारी यांना डावले जावू शकते.

**भानुसींह रावत** — नगरसेवकास आकृती बंधाची माहीती देण्यास काय हरकत आहे. आताच्या आता माहिती देण्यात यावे.

**अब्दुल सत्तार** — ब-याच कर्मचारी यांच्यावर अन्याय झालेला आहे, काही कर्मचारी आमच्या कडे येत आहेत. आकृती बंधाची सर्व सदस्यांना माहितीची प्रत देण्यात यावी.

**फारुक अली खान** — आकृती बंधाची सर्व सदस्यांना माहितीची प्रत देण्यात यावी.

**उमेश पवळे** — आकृती बंधाची सर्व सदस्यांना माहीती देण्यात आल्यानंतर समिती गठीत करण्याची आवश्यकता नाही आपण सक्षम नाही काय, आपण सक्षम आहोत त्यामुळे समिती गठीत करण्यात येवू नये.

**भानुसींह रावत** — समितीमध्ये कोणाची नांवे घ्यावयाचे आहे ते सर्व अधिकार सभापती यांना देण्यात येतात.

**उमेश पवळे** — आकृती बंधाचा अहवाल जो शासनाला पाठविला आहे त्याची प्रत तयार करुंन सर्व सदस्यांना देण्यास किती वेळ लागतो ते प्रशासनाने सांगावे.

**भानुसींह राबत** — 30 नोव्हेंबर 18 पर्यंत सर्व सदस्यांना अहवाल शासनाला पाठविला आहे त्याची प्रत देण्यात यावी.

**प्राधिकृत अधिकारी** — 30 तारखेपर्यंत सर्वांना प्रत देण्यात येईल.

**स. शेर अली** — नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांचे सेवाप्रवेश नियम व आकृतीबंध शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला असुन सदरील सेवाप्रवेश नियम व आकृतीबंधात अनेक पदांचा अर्हता व वेतनश्रेणीत अधिकारी व कर्मचा-यांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास आले असुन सदरील सेवाप्रवेश नियम व आकृतीबंध मंजुर झाल्यानंतर मनपाकेतील अधिकारी कर्मचा-यांना पदोन्नती देणे अथवा सरळसेवेने नविन पदे भरावयाचे असल्यास सदरील पदांची सेवाप्रवेश नियम व आकृतीबंधानुसार अर्हता व वेतनश्रेणी पडताळणी करण्यासाठी एक उपसमिती गठीत करण्यात येत असुन सदरील उपसमितीत सभापती स्थायी समिती यांच्या अध्यक्षते खाली श्री अ. शमीम अब्दुल्ला, श्री फारुख अली खान, तिडके प्रशांत, भानुसिंह रावत, श्री स. शेर अली यांची राहतील सदरील उपसमितीने आपला अहवाल दिल्यानंतरच प्रशासनाने पदोन्नती अथवा नविन सरळसेवेने पदे भरण्यास मान्यता देण्यात यावी.

**फारुख अली खान** — श्री स. शेर अली यांनी उपमिती गठीत करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** — श्री स. शेर अली यांनी उपमिती गठीत करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 89** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांचे सेवाप्रवेश नियम व आकृतीबंध शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला असुन सदरील सेवाप्रवेश नियम व आकृतीबंधात अनेक पदांचा अर्हता व वेतनश्रेणीत अधिकारी व कर्मचा-यांवर अन्याय होत असल्याचे निदर्शनास आले असुन सदरील सेवाप्रवेश नियम व आकृतीबंध मंजुर झाल्यानंतर मनपाकेतील अधिकारी कर्मचा-यांना पदोन्नती देणे अथवा सरळसेवेने नविन पदे भरावयाचे असल्यास सदरील पदांची सेवाप्रवेश नियम व आकृतीबंधानुसार अर्हता व वेतनश्रेणी पडताळणी करण्यासाठी एक उपसमिती गठीत करण्यात येत असुन सदरील उपसमितीत सभापती स्थायी समिती यांच्या अध्यक्षते खाली श्री अ. शमीम अब्दुल्ला, श्री फारुख अली खान, तिडके प्रशांत, भानुसिंह रावत, श्री स. शेर अली यांची राहतील सदरील उपसमितीने आपला अहवाल दिल्यानंतरच प्रशासनाने पदोन्नती अथवा नविन सरळसेवेने पदे भरण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.01**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका **नांदेडसाठी शहरातील विविध कामे करण्यासाठी जसे पावसाळयापुर्व लहान मोठे नाले सफाई तसेच प्रभागातील घनकचरा बाबतची विविध प्रकारची कामे करण्यासाठी एक नविन Backhoe Loader 4 DX (JCB) GeM (Government e Marketplace) वरुन सदर मशिनचे अधिकृत विक्रेता मे. जेसिबी इंडीया लि,** यांचेकडून खरेदी करणे करिता लागणारा खर्च रक्कम रुपये 26,83,000/- (अक्षरी रक्कम रुपये सव्वीस लक्ष त्रयाऐन्शी हजार फक्त) चा RTGS व्दारे

कंपनीस रक्कम अदाई करण्यात आलेली आहे करिता सदरचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर कार्योत्तर मान्यतेसाठी सादर

**उप आयुक्त** जीईएम पोर्टलवर खरेदी केलेली मशीन आहे त्याची नोंद घेण्यासाठी सदर विषय आलेले आहे. कार्यात्तर हा शब्द त्यात नको आहे.

**फारुक अली खान** नोंद घेण्यासाठी आला असेल तर का लिहिला नाही.

**जोत्सना गोडबोले** लेडीज आहे म्हणुन काम केले जात नाही काय हे सांगावे. मी एका वर्षापासुन बोलत आहेत पण त्याचा विचार कोणी करत नाही. माझ्या गल्लीत पाणी येत नाही. त्यावर उपाय योजना का केली जात नाही याचा खुलासा करण्यात यावा. 50 ते 60 घरांना पाणी मिळत नाही.

**कार्यकारी अभियंता (पापु)** मी स्वतः जावून पहाणी करुन अहवाल देतो.

**सभापती** 30 तारखेपर्यत त्यांच्या घरी पाणी मिळाले पाहीजे. याची दक्षता कार्यकारी अभियंता श्री अंधारे यांनी घ्यावी.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या कार्योत्तर मान्यतेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 90** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका **नांदेडसाठी शहरातील विविध कामे करण्यासाठी जसे पावसाळयापुर्व लहान मोठे नाले सफाई तसेच प्रभागातील घनकचरा बाबतची विविध प्रकारची कामे करण्यासाठी एक नविन Backhoe Loader 4 DX (JCB) GeM (Government e Marketplace) वरुन सदर मशिनचे अधिकृत विक्रेता मे. जेसिबी इंडीया लि,** यांचेकडून खरेदी करणे करिता लागणारा खर्च रक्कम रुपये 26,83,000/- (अक्षरी रक्कम रुपये सव्वीस लक्ष त्रयाऐन्शी हजार फक्त) चा RTGS व्दारे कंपनीस रक्कम अदाई करण्यात आलेली आहे करिता सदरचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर कार्योत्तर मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.02**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील जुन्या वस्तीत **मलवाहिनींच्या व चेंबर्सच्या देखभाल दुरुस्ती व साफसफाईसाठी छोटया आकाराच्या 04 जेटींग व 02 गल्फर मशिन (Mini Suction and Jeeting Machine Mounted on Bollero Pick-up Sludge Storage Tank Capacity-1000 Ltr) GeM (Government e-Mrketplace) वरुन अधिकृत उत्पादक व विक्रेता मे. यु.एस. एन्टरप्रायजेस, सर्वे नं.उ 166 मोहन नगर, पांजरपोल, पुणे नाशिक हायवे गोडाऊन चौक भोसरी पुणे यांचेकडून खरेदी करणे** करिता लागणारा खर्च रक्कम रुपये 91,05,860/- (अक्षरी रुपये एक्यान्नव लक्ष पांच हजार आठशे साठ फक्त) यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता प्रदान करणे करिता सदर प्रस्ताव स्थायी समिती सभे समोर मंजुरीस्तव सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 91** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील जुन्या वस्तीत **मलवाहिनींच्या व चेंबर्सच्या देखभाल दुरुस्ती व साफसफाईसाठी छोटया आकाराच्या 04 जेटींग व 02 गल्फर मशिन (Mini Suction and Jeeting Machine Mounted on Bollero Pick-up Sludge Storage Tank Capacity-1000 Ltr) GeM (Government e-Mrketplace) वरुन अधिकृत उत्पादक व विक्रेता मे. यु.एस. एन्टरप्रायजेस, सर्वे नं.उ 166 मोहन नगर, पांजरपोल, पुणे नाशिक हायवे गोडाऊन चौक भोसरी पुणे यांचेकडून खरेदी करणे** करिता लागणारा खर्च रक्कम रुपये 91,05,860/- (अक्षरी रुपये एक्यान्नव लक्ष पांच हजार आठशे साठ फक्त) यास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यता येतो.

**विषय क्रं.03**

नावाशमनपाकेच्या अंतर्गत हैदरबाग UCHC दवाखाना, देगलुर नाका येथे एक इंटरकॉम 32 प्लग सर्व्हीसची मशीन व 27 टेलिफोन संच बसविण्यात आले असल्यामुळे कामाची तातडी व निकष लक्षात घेता खरेदी श्री रिकेश पिठाडीया जलाराम इंटरप्रायजेस यांच्याकडून स्थानिक बाजार दराप्रमाणे खरेदी करून पुरवठा करण्यात आले त्यास रुपये 1,34,200/- ऐवढा खर्च झालेला आहे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण-5 चे कलम 2 अन्वये कार्योत्तर आर्थीक व प्रशासकीय मान्यता प्रदान करणेस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेचा प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 92** **ठराव**

नावाशमनपाकेच्या अंतर्गत हैदरबाग UCHC दवाखाना, देगलुर नाका येथे एक इंटरकॉम 32 प्लग सर्व्हीसची मशीन व 27 टेलिफोन संच बसविण्यात आले असल्यामुळे कामाची तातडी व निकष लक्षात घेता खरेदी श्री रिकेश पिठाडीया जलाराम इंटरप्रायजेस यांच्याकडून स्थानिक बाजार दराप्रमाणे खरेदी करून पुरवठा करण्यात आले त्यास रुपये 1,34,200/- ऐवढा खर्च

झालेला आहे करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण-5 चे कलम 2 अन्वये कार्योत्तर आर्थीक व प्रशासकीय मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.04**

**विषय :-** दिनांक 17 सप्टेंबर 2018 रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करणेकामी झालेल्या खर्चाचे देयक अदाई करणे बाबत

संदर्भ :- 1) कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/8265/18 दिनांक 12.09.2018
2) जाहीर सुचना क्रं. क्षेका.3/802/18/14.09.2018
3) श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे कोटेशन नं. 2 दिनांक 14.09.2018
4) कार्यालयीन आदेश क्रं, क्षेका-3/803/18 दिनांक 15.09.2018
5) श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे बिल नं. P-024 दिनांक 24.09.2018

उपरोक्त विषय संदर्भ क्रं. 1 च्या आदेशान्वये दि. 17 सप्टेंबर 2018 रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त सकाळी 8.40 वाजता माता गुजरीजी विसावा उद्यानात स्मृतीस्तंभास मानवंदना व पुष्पचक्र अर्पण करण्याचा कार्यक्रम व सकाळी 9.00 वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रमा करणोकमी आवश्यकती व्यवस्था करण्यासाठी पावसाचे दिवस असल्यामुळे वॉटरप्रुफ मंडप, रेड कारपेट, फायबर चेअर, सोफा विथ कव्हर साईडींग ई. साहित्यासाठी संदर्भ क्रं. 2 अन्वये जाहीर सुचनेव्दारे कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार तिन कोटेशन प्राप्त झाले परंतु श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे कोटेशन कमी दराचे असल्यामुळे संदर्भ क्रं. 04 अन्वये उक्त प्रमाणे व्यवस्था करण्यासाठी संबंधीताना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/क्षेका-3/1001/18 दिनांक 20.10.2018 अन्वये आदेश देण्यात आले होते.

संदर्भ क्रं. 5 नुसार उक्त प्रमाणे आवश्यकती व्यवस्था करणेकामी एकूण रुपये 1,18,973/- (अक्षरी रुपये एक लाख आठरा हजार नऊशे त्र्याहातर फक्त) चे देयके सादर केलेले आहे. सदरचे देयक श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांच्या नांवे अदाई करण्याकरिता कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात आली त्यास मान्यतेस्तव स्थायी समिति समोर सादर.

सदरील खर्च सालसन 2018-19 च्या मनपा अंदाजपत्रकातील संबंधीत लेखाशिर्षकातुन करण्यात यावा.

**स. शेर अली** याच एजन्सीला का काम देण्यात येते. कारण यापुर्वीही असेच काम या एजन्सीला देण्यात आलेले आहे. निविदा काढुन काम करण्यात यावे.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 93** **ठराव**

दिनांक 17 सप्टेंबर 2018 रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करणेकामी झालेल्या खर्चाचे देयक अदाईसाठी कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/8265/18 दिनांक 12.09.2018 आदेशान्वये दि. 17 सप्टेंबर 2018 रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिना निमित्त सकाळी 8.40 वाजता माता गुजरीजी विसावा उद्यानात स्मृतीस्तंभास मानवंदना व पुष्पचक्र अर्पण करण्याचा कार्यक्रम व सकाळी 9.00 वाजता ध्वजारोहणाचा कार्यक्रमा करणेकमी आवश्यकती व्यवस्था करण्यासाठी पावसाचे दिवस असल्यामुळे वॉटरप्रुफ मंडप, रेड कारपेट, फायबर चेअर, सोफा विथ कव्हर साईडींग ई. साहित्यासाठी जाहीर सुचना क्रं. क्षेका.3/802/18/14.09.2018 अन्वये जाहीर सुचनेव्दारे कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार तिन कोटेशन प्राप्त झाले परंतु श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे कोटेशन कमी दराचे असल्यामुळे कार्यालयीन आदेश क्रं, क्षेका-3/803/18 दिनांक 15.09.2018 अन्वये उक्त प्रमाणे व्यवस्था करण्यासाठी संबंधीताना कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/क्षेका-3/1001/18 दिनांक 20.10.2018 अन्वये आदेश देण्यात आले होते.

श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे बिल नं. P-024 दिनांक 24.09.2018 नुसार उक्त प्रमाणे आवश्यकती व्यवस्था करणेकामी एकूण रुपये 1,18,973/- (अक्षरी रुपये एक लाख आठरा हजार नऊशे त्र्याहातर फक्त) चे देयके सादर केलेले आहे. सदरचे देयक श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांच्या नांवे अदाई करण्याकरिता कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/क्षेका-3/1001/18 दिनांक 20.10.2018 च्या आदेशाअन्वये कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात आली त्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.05**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे श्रीमती गौतमी महामती हंकारे ह्या सेवानिवृत्त सह शिक्षका प्राथमिक शाळा क्रं. 11 भिमसंदेश कॉलनी नांदेड मनपा नांदेड यांनी सदरील शाळेला सर्वशिक्षा अभियान अंतर्गत शाळा देखभाल दुरुस्तीसाठी सालसन 2012-13 ते 2016-17 पर्यंत आर्थीक अनुदान म्हणुन एकुण रुपये रु 2,20,000/- प्राप्त झाले होते त्यापैकी रक्कम रुपये 1,64,000/- चे दरपत्रके घेण्यात आलेले असुन उर्वरीत शिल्लक रक्कम रुपये 56,000/- किरकोळ खर्च शाळा व्यवस्था समितीचा ठराव घेवुन सदरील शाळेवर खर्च करण्यास मान्यात प्रदान करण्यात आलेली आहे.

करिता मनपाकेच्या प्राथमिक शाळा क्रं. 11 भिमसंदेश कॉलनी नांदेड येथील श्रीमती गौतमी महामती हंकारे सेवानिवृत्त सह शिक्षीका यांनी सदरील शाळा देखभाल दुरुस्तीसाठी सालसन 2012-13 ते 2016-17 पर्यंत प्राप्त अनुदानातुन दरपत्राकानुसार खर्च केलेले रक्कम रुपये 1,64,000/- व शाळा व्यवस्थापन समितीचा ठरावानुसार किरकोळ खर्च रु. 56,000/- करण्यात आलेला असुन असे एकूण रक्कम रुपय 2,20,000/- चा झालेल्या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**सभापती** प्रशासनाने समायोजन करण्याच्या प्रस्तावास मान्यता सादर केला असुन त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 94** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे श्रीमती गौतमी महामती हंकारे हया सेवानिवृत्त सह शिक्षका प्राथमिक शाळा क्रं. 11 भिमसंदेश कॉलनी नांदेड मनपा नांदेड यांनी सदरील शाळेला सर्वशिक्षा अभियान अंतर्गत शाळा देखभाल दुरुस्तीसाठी सालसन 2012-13 ते 2016-17 पर्यंत आर्थीक अनुदान म्हणुन एकुण रुपये रु 2,20,000/- प्राप्त झाले होते त्यापैकी रक्कम रुपये 1,64,000/- चे दरपत्रके घेण्यात आलेले असुन उर्वरीत शिल्लक रक्कम रुपये 56,000/- किरकोळ खर्च शाळा व्यवस्था समितीचा ठराव घेवुन सदरील शाळेवर खर्च करण्यास मान्यात प्रदान करण्यात आलेली आहे.

करिता मनपाकेच्या प्राथमिक शाळा क्रं. 11 भिमसंदेश कॉलनी नांदेड येथील श्रीमती गौतमी महामती हंकारे सेवानिवृत्त सह शिक्षीका यांनी सदरील शाळा देखभाल दुरुस्तीसाठी सालसन 2012-13 ते 2016-17 पर्यंत प्राप्त अनुदानातुन दरपत्राकानुसार खर्च केलेले रक्कम रुपये 1,64,000/- व शाळा व्यवस्थापन समितीचा ठरावानुसार किरकोळ खर्च रु. 56,000/- करण्यात आलेला असुन असे एकूण रक्कम रुपय 2,20,000/- चा झालेल्या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.06** **प्रस्ताव**

अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त शासन निधीचा विनियोग आज पर्यंत झालेला नाही या बाबत सभागृहात चर्चा करणे बाबत.

**सुचक** :- भानुसिंह रावत, अ. लतीफ. अ. मजीद **अनुमोदक** :- सौ. मोहीनी येवनकर

**भानुसिंह रावत** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त शासन निधीच्या अनुषंगाने स. सदस्यांच्या शिफारशीनुसार त्यांच्या प्रभागात मुलभुत सुविधा व विकासाचे कामे तात्काळ करण्यात यावी

**सभापती** श्री भानुसिंह रावत यांनी सुचविल्यानुसार प्रस्तावास मान्यता देण्यात येते तसेच प्रभाग क्रं. 13 अंतर्गत जी नविन कामे याच योजने अंतर्गत प्रस्तावित करण्यात आली आहेत त्या कामांची निविदा प्रक्रिया लवकरात लवकर अंतीम करण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**ठराव क्रं. 95** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजने अंतर्गत प्राप्त शासन निधीच्या अनुषंगाने स. सदस्यांच्या शिफारशीनुसार त्यांच्या प्रभागात मुलभुत सुविधा व विकासाचे कामे तात्काळ करण्यात यावी. तसेच प्रभाग क्रं. 13 अंतर्गत जी नविन कामे याच योजने अंतर्गत प्रस्तावित करण्यात आली आहेत त्या कामांची निविदा प्रक्रिया लवकरात लवकर अंतीम करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो. नियमानुसार आयुक्तांनी पुढील वैधानिक कार्यवाही करावी.

**विषय क्रं.07** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेतील आस्थापनेवर कार्यरत असलेल्या इमारत निरीक्षक यांना प्रदान करण्यता आलेली वेतनश्रेणी ही मनपा निवड समिती, तत्कालीन मुख्यलेखा परिक्षक व शासनाचे पत्रानुसार उच्चम वेतनश्रेणी लागु करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात तिन प्राधिकरण असुन आयुक्त, स्थायी समिती, उच्चत्तम व नियुक्ती प्राधिकरण म्हणुन महानगरपालिका सर्वसाधारण सभा असुन एखादा अधिकारी व कर्मचा-यांना वेतनश्रेणी चुकीची देण्यात आलेली असेल तर त्याचा सविस्तर अहवाल नियुक्ती प्राधिकरण व धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार महासभेस असतांना प्रभारी मुख्यलेखापरिक्षक व उपआयुक्त प्रशासन यांनी त्रुटी काढून संबंधीत इमारत निरीक्षक यांच्या वेतनश्रेणीचा प्रकरण महासभेसमोर न आणता परस्पर वेतनश्रेणी कमी करुन खालच्या पदाची वेतनश्रेणीवर आणण्यात आलेला आहे जे की नियमांच्या विरुध्द असुन मनपा सर्वसाधारण सभेची अवमान केल्याचे सिध्द होत आहे.

करिता इमारत निरीक्षक यांना पुर्ववत वेतनश्रेणी लागु करणे व ज्या अधिका-यांनी महासभेची अवमान केली त्या अधिका-यांवर कार्यवाही करण्यास शासनास शिफारस करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते

**सुचकः-** अ. लतीफ अ मजीद **अनुमोदक :-** सौ. मोहीणी येवनकर

**स. शेर अली** कोणत्या नियमाने इमारत निरीक्षक यांना रिवर्ड केले आहे. याचा खुलासा प्रशासनाने करावा.

**प्राधिकृत अधिकारी** इमारत निरीक्षक यांना आपण रिवर्ड केले नाही, त्यांची वेतन श्रेणी 4500 - 7000 अशी होती. ही वेतनश्रेणी सुधारीत 5000 ते 8000 करण्याचा ठराव घेण्यात आला होता. तो शासनास आपण पाठविला होता परंतू हा प्रस्ताव शासनाने वापस पाठविला होता. शासनाने पुन्हा प्रस्ताव सादर करावा असे कळविले आहे. 5000 ते 8000 ही वेतनश्रेणी 2011 ला पाठविला. त्यांना 4300 चा ग्रेड पे लागु करण्यात आला होता. ज्या प्रस्तावास शासनाची मंजूरी पाहीजे होती तो प्रस्तावच शासनाने परत केला आहे. 2011 नंतर हा प्रस्ताव शासनास पाठविणे आवश्यक होते परंतू अदयाप पर्यंत पाठविण्यात आलेला नाही. शासनाची ज्या प्रस्तावास मंजूरीच नाही त्यामुळे पुढील लाभ देता येत नाहीत. ते कालबध्दला पात्र आहेत. कालबध्द जी नियमानुसार येणारी वेतनश्रेणी ती त्याना देता येवू शकते.

**स. शेर अली** वार्षीक वेतन वाढी रोखण्यासाठी प्रशासन स्थायी समिती पुढे आणले जाते परंतू वेतनश्रेणीत दुरुस्ती आहे ती का स्थायी समिती पुढे ठेवणे आवश्यक होते. तसे आपण केले नाही. शासनास पाठविण्याचे काम हे प्रशासनाचे होते त्यांनी का पाठविला नाही याचा खुलासा करावा.

**आनंद चव्हाण** आपल्या मनपाचे कर्मचारी इतर अधिका-याच्या घरी काम करीत आहे अशा कर्मचारी यांना आपण अशीच पगार देत आहोत. त्यांना पुर्ववत त्यांच्या मुळ पदावर आणावे. 200 लोक इतरत्र काम करीत आहेत. नांवासहीत पुढील मिटींगला माहिती देण्यात येईल. दोषी आढळल्यास संबधीतावर कार्यवाही करण्यात येईल.

**म. मसुद अहेमद खान** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दिनांक 30.01.2009 रोजी ठराव क्रं. 194 व्दारे महापालिका आस्थापनेवरील इमारत निरीक्षक या अभिनामाच्या पदास इतर `` ड `` वर्ग महापालिकेत वेतनश्रेणी रुपये 5500-9000 लागु असल्यामुळे महापालिकेतील इमारत निरीक्षक या पदांना तत्कालीन मुख्यलेखा परिक्षक यांच्या अभिप्रायानुसार व महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे 16 नोव्हेंबर 2006 च्या पत्रातील निर्देशानुसार महापालिकेतील इमारत निरीक्षक यांपदांना वेतनश्रेणी रुपये 5500-9000 लागु करण्यास मान्यता दिली त्यानुसार प्रशासनाने दिनांक 31.12.2004 रोजी आदेश निर्गमीत केले आहेत.

इमारत निरीक्षक व आरेखक या पदासाठी सारखीस अर्हता असुन त्याचे कर्तव्य जबाबदा-या सारख्याच आहे. त्यामुळे हि पदे निर्माण करण्यास नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दिनांक 27.03.2003 रोजी ठराव क्रं. 234 व्दारे मान्यता प्रदान केलेली आहे.

परंतु दिनांक 31.12.2004 ते 24.10.2018 या कालावधीत स्थानिक लेखानिधी व महालेखाकार कार्यालय नागपुर यांच्याकडून झालेल्या लेखापरिक्षणा मध्ये इमारत निरीक्षक या पदास लागु केलेल्या वेतनश्रेणी रुपये 5000-8000 बद्दल कोणताही आक्षेप नाही. तसेच सदरची वेतनश्रेणी महासभेच्या मान्यतेने लागु केलेली असल्यामुळे याप्रकरणी महासभेची मान्यता न घेता अथवा संबंधीत कर्मचा-यांना बाजु मांडण्याची संधी न देता अथवा याप्रकरणी शासनाचे मार्गदर्शन न मागविता. तसेच वेतनश्रेणी रद्द करण्यापुर्वी महासभेची मान्यता न घेता यापुर्वीच्या महासभेच्या ठरावाची अमलबजावणी झालेली असतांना या सर्वबाबी नजर अंदाज करुन कोणतीही तक्रार अथवा कोणताही आक्षेप सादर नसतांना श्री संतोष ह. कंदेवार मुख्यलेखाधिकारी, श्रीमती शोभा मुंडे प्रभारी मुख्यलेखा परिक्षक, व श्रीमती गिता ठाकरे प्रभारी उपआयुक्त प्रशासन यांनी स्वतःहुन सदरची वेतनश्रेणी रद्द करुन अतिप्रदान झालेली रक्कम वसुल करण्या बाबत नियमबाह्य कार्यवाही केलेली आहे हा महासभेचा अवमान झाल्याचे सिध्द झालेले आहे.

करिता याप्रकरणी श्री संतोष ह. कंदेवार मुख्यलेखाधिकारी, श्रीमती शोभा मुंडे प्रभारी मुख्यलेखा परिक्षक यांची शासनाच्या वित्त विभागाकडुन व श्रीमती गिता ठाकरे प्रभारी उपआयुक्त प्रशासन यांची शासनाच्या नगरविकास विभागाकडुन चौकशी करुन शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते समंत करते तसेच इमारत निरीक्षक यांना पुर्ववत वेतनश्रेणी लागु करण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**अ. लतीफ** माझ्या प्रस्तावानुसार श्री मसुद अहेमद खान यांनी जो दुरुस्ती मांडली त्यानुसार मान्यता देण्यात यावी.

**स. शेर अली** श्री मसुद अहेमद खान यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** श्री अ लतीफ यांच्या प्रस्तावा संबंधी श्री मसुद अहेमद खान यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यानुसार मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 96** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दिनांक 30.01.2009 रोजी ठराव क्रं. 194 व्दारे महापालिका आस्थापनेवरील इमारत निरीक्षक या अभिनामाच्या पदास इतर `` ड `` वर्ग महापालिकेत वेतनश्रेणी रुपये 5500-9000 लागु असल्यामुळे महापालिकेतील इमारत निरीक्षक या पदांना तत्कालीन मुख्यलेखा परिक्षक यांच्या अभिप्रायायनुसार व महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाचे 16 नोव्हेंबर 2006 च्या पत्रातील निर्देशानुसार महापालिकेतील इमारत निरीक्षक यांपदांना वेतनश्रेणी रुपये 5500-9000 लागु करण्यास मान्यता दिली त्यानुसार प्रशासनाने दिनांक 31.12.2004 रोजी आदेश निर्गमीत केले आहेत.

इमारत निरीक्षक व आरेखक या पदासाठी सारखीस अर्हता असुन त्याचे कर्तव्य जबाबदा-या सारख्याच आहे. त्यामुळे हि पदे निर्माण करण्यास नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सर्वसाधारण सभेने दिनांक 27.03.2003 रोजी ठराव क्रं. 234 व्दारे मान्यता प्रदान केलेली आहे.

परंतु दिनांक 31.12.2004 ते 24.10.2018 या कालावधीत स्थानिक लेखानिधी व महालेखाकार कार्यालय नागपुर यांच्याकडून झालेल्या लेखापरिक्षणा मध्ये इमारत निरीक्षक या पदास लागु केलेल्या वेतनश्रेणी रुपये 5000-8000 बद्दल कोणताही आक्षेप नाही. तसेच सदरची वेतनश्रेणी महासभेच्या मान्यतेने लागु केलेली असल्यामुळे याप्रकरणी महासभेची मान्यता न घेता अथवा संबंधीत कर्मचा-यांना बाजु मांडण्याची संधी न देता अथवा याप्रकरणी शासनाचे मार्गदर्शन न मागविता. तसेच वेतनश्रेणी रद्द करण्यापुर्वी महासभेची मान्यता न घेता यापुर्वीच्या महासभेच्या ठरावाची अमलबजावणी झालेली असतांना या सर्वबाबी नजर अंदाज करुन कोणतीही तक्रार अथवा कोणताही आक्षेप सादर नसतांना श्री संतोष ह. कंदेवार मुख्यलेखाधिकारी, श्रीमती शोभा मुंडे प्रभारी मुख्यलेखा परिक्षक, व श्रीमती गिता ठाकरे प्रभारी उपआयुक्त प्रशासन यांनी स्वत:हुन सदरची वेतनश्रेणी रद्द करुन अतिप्रदान झालेली रक्कम वसुल करण्या बाबत नियमबाह्य कार्यवाही केलेली आहे हा महासभेचा अवमान झाल्याचे सिध्द झालेले आहे.

करिता याप्रकरणी श्री संतोष ह. कंदेवार मुख्यलेखाधिकारी, श्रीमती शोभा मुंडे प्रभारी मुख्यलेखा परिक्षक यांची शासनाच्या वित्त विभागाकडुन व श्रीमती गिता ठाकरे प्रभारी उपआयुक्त प्रशासन यांची शासनाच्या नगरविकास विभागाकडुन चौकशी करुन शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते समंत करते तसेच इमारत निरीक्षक यांना पुर्ववत वेतनश्रेणी लागु करण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**विषय क्रं.08** **प्रस्ताव**

शहरातील बि.ओ.टी. अंतर्गत प्रकल्पांची सद्यस्थिती सभागृहासमोर ठेवुन चर्चा करणे बाबत.

**सुचक** :- भानुसिंह रावत, अ. लतीफ. अ. मजीद **अनुमोदक** :- सौ. मोहीनी येवनकर

**स. शेर अली** रणजितसिंघ मार्केटचा प्रस्ताव स्थायी समितीस सादर करण्यात आला होता तर हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेस पाठविण्यात आला या पैकी बरोबर कोणता आहे याची माहिती सभागृहास दयावी.

**फारुक अली खान** स्थायी समितीस पाठविलेला बरोबर आहे की आता महा सभेस पाठविलेले बरोबर आहे याची माहिती दयावी.

**मुख्य लेखा परिक्षक** पुढील मिटींगमध्ये तपासुन घेवून माहिती देण्यात येईल.

**उमेश पवळे** पुढील मिटींग मध्ये संचिका पाहून माहिती देण्यात येत असेल तर मिटींग घेण्यास काय उपयोग आहे आपणास नियमाचे पुर्णपणे माहिती असणे आवश्यक आहे.

**भानुसिंह रावत** जो पर्यत उत्तर मिळत नाही तोपर्यत मिटींग पुढे ढकलण्यात यावी.

**उप आयुक्त (मालमत्ता)** जमीन डेव्हलमेंट करणे हा सर्व साधारण सभेचा निर्णय आहे. निविदा काढून मान्यता घेण्यात आली त्यात एक उददेश होता की वेळ जाईल त्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. दर मान्यतेबाबत कायदयामध्ये कोणतीही तरतुद दिसुन येत नाही. म्हणुन तो अधिकार सर्वसाधारण सभेला आहे.

**स. शेर अली** स्थायी समितीने यापुर्वी मंजूर केले ते चुक असेल तर ते रदद करावे लागेल.

**सभापती** दर मान्यतेचे अधिकार कोणास आहे हे कंदेवार उप आयुक्त यांनी सांगावे.

**उप आयुक्त (मालमत्ता)** दर मान्यतेचे अधिकार स्थायी समितीस आहेत. यापुर्वी सर्वसाधारण सभेचा ठराव झालेला आहे. त्यामुळे आता महासभेच्या पुढे जाण्याची आवश्यकता नाही. दर मान्यतेसाठी आजच्या आज ठराव घेण्यात येते.

**अब्दुल सत्तार** सभापती यांनी दर मान्यतेसाठी काय लिहावयाचे आहे ते लिहुन ठराव करण्याच्या अधिकार देण्यात यावा.

**भानुसिंह रावत** माझ्या प्रस्तावा मी पुढील प्रमाणे दुरुस्ती प्रस्ताव मांडत आहे त्यानुसार मान्यता देण्यात यावी. मनपा हद्यीतील तरोडेकर मार्केट हे बि.ओ.टी तत्वावर विकसित करण्याकरिता महासभेच्या सादर करण्यात आलेला असुन जे कि नियमबाह्य आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 व प्रकरण 5.2(2) अन्वये निविदा मंजुर करण्याचे अधिकार स्थायी समितीस प्राप्त आहे.

यापुर्वी शहरात मनपाके मार्फत पार पडलेल्या बि.ओ.टी. प्रकल्पास प्रशासनाने केलेल्या शिफारस व अधिनियमाव्दारे प्राप्त अधिकारानुसार स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 73 मध्ये सुरुवातीसच स्पष्ट नमुद करण्यात आले आहे की, स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध संपादन करणे व त्यांचा विनियोग करणे यासंबंधीच्या संविदा धरुन या अधिनियमान्वये किंवा या अधिनयमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी संविदा करण्याच्या बाबतीत पुढील तरतुदी लागु होतील. लगेच 73(अ) नुसार प्रत्येक संविदा आयुक्त करतील, परंतु 73 (ब) नुसार आयुक्ताला दुस-या एखादया नगरपालिका प्राधिका-याची मान्यता किंवा मंजुरी मिळाल्यापासुन जे प्रयोजन या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये पार पाडता येणार नाहीत. अशा कोणत्याही प्रयोजनासाठी प्रथमतः रितसर अशी मान्यता किंवा मंजुरी देण्यात येई पर्यंत किंवा देण्यात आली नसेल तर त्यास अशी कोणत्याही संविदा करता येणार नाही असे स्पष्ट नमुद आहे. तसेच 73 (क) नुसार वरील तरतुदीच्या अधिनतेने, पंचवीस लाख रुपयापेक्षा अधिक खर्च अंतर्भुत असेल अशा संविदेस स्थायी समितीची पुर्व मान्यता आवश्यक असेल असे अधिनियमात नमुद आहे.

अधिनियमाव्दारे स्थायी समितीस अधिकार प्राप्त असतांना प्रशाससनाने निविदा मान्यतेचा प्रस्ताव महासभेसमोर पाठविला आहे. अधिनियमाव्दारे प्रत्येक प्राधिका-यांची जबाबदारी अधिकारी निश्चित करण्यात आलेले आहेत दर मान्यता / निविदा मान्यता हा स्थायी समितीचा अधिकार / हक्क आहे. प्रशासनाने बि.ओटी. च्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव महासभेकडे पाठविलेला असुन तो नियमाच्या विरुध्द आहे.

<u>थोडकयात पुढील प्रमाणे</u> :- (1) प्रकरणत सात संविदा 73 हे कलम कोणत्याही संविदा उत्पन्न व खर्च असे दोन्ही संदर्भात लागू आहे. (2) प्रत्येक संविदा करणे ही प्रशासनाची जबाबदारी 73(अ) (3) आयुक्तास दुस-या आवश्यक त्या प्राधिका-यांची रितसर मान्यता मिळाल्याशिवाय संविदा करता येणार नाही 73(ब) (4) पंचवीस लाख रुपये पेक्षा अधिकच्या संविदेस स्थायी समितीची पुर्वमान्यता आवश्यक आहे.

स्थायी समितीच्या अधिकारातील विषयक महासभेकडे पाठवुन स्थायी समितीच्या अधिकारावर अन्याय होत आहे. तरी असे न करता तरोडेकर मार्केट बि.ओ.टी. प्रकल्पाचा निविदा मान्यतेचा प्रस्ताव जो महासभेसमोर ठेवण्याकरिता नगरसचिव कार्यालयास पाठविला आहे तो परत घेऊन योग्य त्या सुधारणा सुधारना करुन स्थायी समितीच्या सभेस निविदा मान्यतेसाठीचा प्रस्ताव 30 नोव्हेंबर 2018 पर्यंत पाठविण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**अ. लतीफ** श्री भानुसिंह यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे.

**सभापती** श्री भानुसिंह यांनी जो दुरुस्ती प्रस्ताव मांडला त्यास मान्यता देण्यता येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 97** **ठराव**

मनपा हद्यीतील तरोडेकर मार्केट हे बि.ओ.टी तत्वावर विकसित करण्याकरिता महासभेच्या सादर करण्यात आलेला असुन जे कि नियमबाह्य आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 व प्रकरण 5.2(2) अन्वये निविदा मंजुर करण्याचे अधिकार स्थायी समितीस प्राप्त आहे.

यापुर्वी शहरात मनपाके मार्फत पार पडलेल्या बि.ओ.टी. प्रकल्पास प्रशासनाने केलेल्या शिफारस व अधिनियमाव्दारे प्राप्त अधिकारानुसार स्थायी समितीने मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम 73 मध्ये सुरुवातीसच स्पष्ट नमुद करण्यात आले आहे की, स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध संपादन करणे व त्यांचा विनियोग करणे यासंबंधीच्या संविदा धरुन या अधिनियमान्वये किंवा या अधिनयमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी संविदा करण्याच्या बाबतीत पुढील तरतुदी लागु होतील. लगेच 73(अ) नुसार प्रत्येक संविदा आयुक्त करतील, परंतु 73 (ब) नुसार आयुक्ताला दुस-या एखादया नगरपालिका प्राधिका-याची मान्यता किंवा मंजुरी मिळाल्यापासुन जे प्रयोजन या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीन्वये पार पाडता येणार नाहीत. अशा कोणत्याही प्रयोजनासाठी प्रथमतः रितसर अशी मान्यता किंवा मंजुरी देण्यात येई पर्यंत किंवा देण्यात आली नसेल तर त्यास अशी कोणत्याही संविदा करता येणार नाही असे स्पष्ट नमुद आहे. तसेच 73 (क) नुसार वरील

तरतुदीच्या अधिनतेने, पंचवीस लाख रुपयापेक्षा अधिक खर्च अंतर्भुत असेल अशा संविदेस स्थायी समितीची पुर्व मान्यता आवश्यक असेल असे अधिनियमात नमुद आहे.

अधिनियमाव्दारे स्थायी समितीस अधिकार प्राप्त असतांना प्रशाससनाने निविदा मान्यतेचा प्रस्ताव महासभेसमोर पाठविला आहे. अधिनियमाव्दारे प्रत्येक प्राधिका-यांची जबाबदारी अधिकारी निश्चित करण्यात आलेले आहेत दर मान्यता / निविदा मान्यता हा स्थायी समितीचा अधिकार / हक्क आहे. प्रशासनाने बि.ओटी. च्या निविदा मान्यतेचा प्रस्ताव महासभेकडे पाठविलेला असुन तो नियमाच्या विरुध्द आहे.

<u>थोडकयात पुढील प्रमाणे</u> :- (1) प्रकरणत सात संविदा 73 हे कलम कोणत्याही संविदा उत्पन्न व खर्च असे दोन्ही संदर्भात लागू आहे. (2) प्रत्येक संविदा करणे ही प्रशासनाची जबाबदारी 73(अ) (3) आयुक्तास दुस-या आवश्यक त्या प्राधिका-यांची रितसर मान्यता मिळाल्याशिवाय संविदा करता येणार नाही 73(ब) (4) पंचवीस लाख रुपये पेक्षा अधिकच्या संविदेस स्थायी समितीची पुर्वमान्यता आवश्यक आहे.

स्थायी समितीच्या अधिकारातील विषयक महासभेकडे पाठवुन स्थायी समितीच्या अधिकारावर अन्याय होत आहे. तरी असे न करता तरोडेकर मार्केट बि.ओ.टी. प्रकल्पाचा निविदा मान्यतेचा प्रस्ताव जो महासभेसमोर ठेवण्याकरिता नगरसचिव कार्यालयास पाठविला आहे तो परत घेऊन योग्य त्या सुधारणा सुधारना करुन स्थायी समितीच्या सभेस निविदा मान्यतेसाठीचा प्रस्ताव 30 नोव्हेंबर 2018 पर्यंत पाठविण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.09 अपिल दिनांक 26.04.18 प्राप्त दि. 25.10.2018**

**प्रति,**

**मा. सभापती साहेब,**

**स्थायी समिती,**

**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**विषय :-** निलंबीत काळात गोठविण्यात आलेली वेतनवाढ मिळणे बाबत

महोदय,

सेवेत विनंती अर्ज सादर करण्यात येतो की, मला दिनांक 05.04.2006 ते दि. 07.04.2007 पर्यंत निलंबीत करण्यात आले होते. त्यानंतर दिनांक 08.02.2007 ला माझे एक वेतनवाढ गोठऊन मला कामावर घेण्यात आले. मी दिनांक 31.07.2012 ला सवामुक्त झालो आहे. तरी माझ्या घरी दोन अपंग मुले असुन मला पगार पुरत नसल्यामुळे ती गोठविलेली वेतनवाढ माझ्या पगारात समाविष्ट करुन थकबाकी देण्यात यावी ही नम्र विनंती. **अर्जदार**

**स्वाक्षरीत/-**

**रामराव दशरथ गायकवाड**

**अनुरेखक (सेवानिवृत्त)**

रा. लक्ष्मीनगर, ए.के.संभापजी मंगल कार्यालय जवळ नांदेड

**<u>प्रशासकिय टिप्पणी</u>**

श्री रामराव दशरथ गायकवाड, सेवानिवृत्त अनुरेखक यांनी मनपा स्थायी समिती सभेसमोर अपिल दाखल करुन त्यांची दिनांक 08.02.2007 ला एक वार्षिक वेतनवाढ गोठवलेली वेतनवाढ पगारात समाविष्ट करुन थकबाकी देण्याची विनंती केली आहे.

श्री रामराव दशरथ गायकवाड सेवानिवृत्त अनुरेखक यांना दिनांक 04.04.2006 रोजी नगररचना विभागातील संचिकेसह वरिष्ठांकडे कार्यालयात उपस्थित न राहता कामात अडथळा निर्माण करणे, वरिष्ठांची दिशाभुल करणे वरिष्ठांच्या सुचनेचे पालन न करणे बांधकाम परवानगीचे प्रस्तावात किरकोळ कारणास्तव अडवणुक करणे यामुळे संबंधीतास कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/आस्था-5/324/2006 दिनांक 05.04.2006 अन्वये निलंबीत करण्यात आले होते.

तदनंतर कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/आस्था-1/2007 दिनांक 08.02.2007 अन्वये निलंबन कालावधी रुजु करुन घ्यावयाच्या दिनांका पर्यंत निलंबनकाळ गृहीत धरुन एक सामान्य वेतनवाढ कायमस्वरुपी गोठवुन नगररचना विभागात सेवेत रुजु करुन घेण्यात आले.

तथापि सदर आदेशा विरुध्द संबंधीतांनी 11 वर्षानंतर अपिल दाखल केले असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 54(4) मध्ये खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल त्यास कळवल्यापासुन एक महिण्याच्या आत स्थायी समितीकडे अपिल करण्याची तरतुद आहे. किरकोळ शास्ती विरुध्द स्थायी समितीकडे अपिल दाखल करण्याची तरतुद नाही त्यामुळे सदरचे अपिल मान्य करता येणार नाही.

**सभापती** श्री रामराव दशरथ गायकवाड से.नि. यांनी महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विहित मुदतीत अपिल सादर न केल्यामुळे संबंधीतांची अपिल नामंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 98** **ठराव**

श्री रामराव दशरथ गायकवाड सेवानिवृत्त अनुरेखक यांनी नगररचना विभागातील संचिकेसह वरिष्ठांकडे कार्यालयात उपस्थित न राहता कामात अडथळा निर्माण करणे, वरिष्ठांची दिशाभुल करणे वरिष्ठांच्या सुचनेचे पालन न करणे बांधकाम परवानगीचे प्रस्तावात किरकोळ कारणास्तव अडवणुक करणे यामुळे संबंधीतास कार्यालयीन आदेश क्रं. साप्रवि/आस्था-5/324/2006 दिनांक 05.04.2006 अन्वये निलंबीत करण्यात आले होते.

तदनंतर कार्यालयीन आदेश क्रं. मनपा/आस्था-1/2007 दिनांक 08.02.2007 अन्वये निलंबन कालावधी रुजु करुन घ्यावयाच्या दिनांका पर्यंत निलंबनकाळ गृहीत धरुन एक सामान्य वेतनवाढ कायमस्वरुपी गोठवुन नगररचना विभागात सेवेत रुजु करुन घेण्यात आले सदरील आदेशा विरुध्द वेतनवाढ सुरु करण्याची विनंती केलेली आहे.

तथापि सदर आदेशा विरुध्द संबंधीतांनी 11 वर्षानंतर अपिल दाखल केले असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 54(4) मध्ये खालच्या पदावर आणण्यात आले असेल, काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल त्यास कळवल्यापासुन एक महिण्याच्या आत स्थायी समितीकडे अपिल करण्याची तरतुद आहे.

करिता श्री रामराव दशरथ गायकवाड सेवानिवृत्त अनुरेखक यांनी केलेली अपिल नियमाच्या विरुध्द असल्यामुळे संबंधीतांची अपिल नामंजुर करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.10**

**नावाशमनपा सर्वसाधारण सभेने दिनांक 19.12.2017 च्या सभेत स्थायी समितीवर 16 सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती केलेली असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20(3) आणि 20(4) अन्वये स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम (2) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिला सभा ज्या महिण्यात भरेल त्या महिण्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त करावे लागणार असल्यामुळे कलम 20(4) नुसार कोणते स्थायी समितीचे सदस्य निवृत्त होतील या करिता सोडतीव्दारे चिठ्ठीया टाकूण (08) सदस्य निवृत्त करणे व सदरील रिक्त होणा-या (08) सदस्यांच्या जागा भरण्या करिता महानगरपालिका महासभेस शिफारस करणे बाबत.**

**नगरसचिव**

नगरसचिव यांनी सर्व 16 सदस्यांच्या चिठठयाचे वाचन केले, सुरुवातीस उमेश पवळे यांच्या नांवाची चिठठीचे वाचन केले.

खालील आठ सदस्यांची नांवे पुढील प्रमाणे आहेत.

महानगरलिका शाळेतील दोन मुलीच्या हस्ते चिठया काढण्यात आल्या आहेत त्यांची नांवे पुढील प्रमाणे आहेत.

**मनपा शाळेतील विद्यार्थीनी कु. समीक्षा** यांच्या हातीने स्थायी समितीच्या 16 सदस्यांच्या चिठ्ठया मधुन खालील 01.12.218 रोजी दुपार नंतर निवृत्त होतील त्यांचे नांवे खालील प्रमाणे आहे

(1) सौ. मुथा कांताबाई प्रकाशचंद (2) श्री प्रशांत तिडके

**मनपा शाळेतील विद्यार्थीनी कु. अनुजा** यांच्या हातीने स्थायी समितीच्या 16 सदस्यांच्या चिठ्ठया मधुन खालील 01.12.218 रोजी दुपार नंतर निवृत्त होतील त्यांचे नांवे खालील प्रमाणे आहे

(3) श्री उमेश पवळे (4) अ. सत्तार अ. गफुर (5) श्री आनंद चव्हाण (6) स. शेर अली (7) श्री सतिश देशमुख (8) सौ. जोत्सना गोडबोले

वरील 08 स्थायी समितीचे सदस्य हे स्थायी समितीतुन दिनांक 01.12.2018 रोजी दुपार नंतर निवृत होत आहे.

**सभापती**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20(3) आणि 20(4) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या 16 सदस्यांपैकी सोडत पध्दतीने (1) श्री अ.सत्तार अ. गफुर (2) श्री चव्हाण आनंद शंकरराव (3) श्री पवळे उमेश देवराव (4) श्री स. शेर अली अ. महेबुब अली (5) श्री देशमुख सतीश पुंडलीकराव (6) श्री तिडके प्रशांत विठ्ठल (7) श्रीमती मुथा कांताबाई प्रकाशचंद (8) सौ. गोडबोले त्योत्सना राजु. तसेच एकूण 08 या स्थायी समिती सदस्य दिनांक 01.12.2018 रोजी निवृत्त होत असल्याने ही नावाशमनपाकेची स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व स्थायी समितीवर नविन 08 सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्यासाठी मनपाकेच्या सर्वसाधारण सभेस शिफारस करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 99** **ठराव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 20(3) आणि 20(4) अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या 16 सदस्यांपैकी सोडत पध्दतीने (1) श्री अ.सत्तार अ. गफुर (2) श्री चव्हाण आनंद शंकरराव (3) श्री पवळे उमेश देवराव (4) श्री स. शेर अली अ. महेबुब अली (5) श्री देशमुख सतीश पुंडलीकराव (6) श्री तिडके

प्रशांत विठ्ठल (7) श्रीमती मुथा कांताबाई प्रकाशचंद (8) सौ. गोडबोले त्योत्सना राजु. तसेच एकूण 08 या स्थायी समिति सदस्य दिनांक 01.12.2018 रोजी निवृत्त होत असल्याने ही नावाशमनपाकेची स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व स्थायी समितीवर नविन 08 सदस्यांची नामनिर्देशनाव्दारे नियुक्ती करण्यासाठी मनपाकेच्या सर्वसाधारण सभेस शिफारस करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**<u>विशेष बाब म्हणुन आयत्या वेळी घेण्यात आलेले</u>**

**विषय -**

नावाशमनपा हद्दीत झोन क्रं. 4 व 5 इतवारा व गुरुव्दारा भागा मध्ये पाणी पुरवठा वाहिणीची दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठी चौथ्यांदा ई-निविदा मागविण्यात आली असता केवळ एकच निविदा कंत्राटदार श्री बि.जी. भास्करे यांची प्राप्त झाली असुन सदरची निविदा, निविदा समितीपुढे उघडण्यात आली असुन ती निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा 4.99% जास्त दराची व रुपये 26,24,750/- एवढया किमंतीची आहे.

सदरील निविदा दर अंदाजपत्रक दरापेक्षा जास्तीचे असल्यामुळे कार्यालयीन पत्र क्रं. 8824/2018 दिनांक 25.09.2018 अन्वये कंत्राटदार श्री बि.जी. भास्करे यांना दर कमी करणेसाठी पाचारण केले असता त्यांनी दिनांक 26.09.2018 चे पत्राव्दारे सदरील काम 4.99% जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रक दराने म्हणजे रुपये 25,00,000/- या किमंतीने करण्याची लेखी समंती दिलेली आहे त्यानुसार सदरील कंत्राटदार यांची निविदा अंदाजपत्रक दराने व रुपये 25,00,000/- (अक्षरी रुपये पंचेविस लक्ष फक्त) या किमंतीची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समितीच्या सभेपुढे सादर.

**सभापती** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 100** **ठराव**

नावाशमनपा हद्दीत झोन क्रं. 4 व 5 इतवारा व गुरुव्दारा भागा मध्ये पाणी पुरवठा वाहिणीची दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठी चौथ्यांदा ई-निविदा मागविण्यात आली असता केवळ एकच निविदा कंत्राटदार श्री बि.जी. भास्करे यांची प्राप्त झाली असुन सदरची निविदा, निविदा समितीपुढे उघडण्यात आली असुन ती निविदा अंदाजपत्रक दरापेक्षा 4.99% जास्त दराची व रुपये 26,24,750/- एवढया किमंतीची आहे.

सदरील निविदा दर अंदाजपत्रक दरापेक्षा जास्तीचे असल्यामुळे कार्यालयीन पत्र क्रं. 8824/2018 दिनांक 25.09.2018 अन्वये कंत्राटदार श्री बि.जी. भास्करे यांना दर कमी करणेसाठी पाचारण केले असता त्यांनी दिनांक 26.09.2018 चे पत्राव्दारे सदरील काम 4.99% जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रक दराने म्हणजे रुपये 25,00,000/- या किमंतीने करण्याची लेखी समंती दिलेली आहे त्यानुसार सदरील कंत्राटदार यांची निविदा अंदाजपत्रक दराने व रुपये 25,00,000/- (अक्षरी रुपये पंचेविस लक्ष फक्त) या किमंतीची निविदा हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय -**

नावाशमनपा हद्दी मध्ये मध्यवर्ती बस स्थानका समोरील उड्डान पुलाखालील उत्तर बाजुचे वाहनतळ + उपहारगृह, नांदेड येथील वाहनतळाचा मक्ता तीन वर्षासाठी देणेसाठी एकूण 03 वेळेस ई-लिलाव निविदा मागविण्यता आल्या तसेच 02 वेळेस जाहिर लिलाव मागविण्यात आले होते परंतु प्रतिसाद मिळाला नाही.

तथापि दुसरी जाहिर लिलाव सुचना दिनांक 02.11.2018 रोजी दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करुन दिनांक 05.11.2018 रोजी मक्ताचा जाहिर लिलाव ठेवण्यात आला होता सदर मक्त्याची सरकारी बोली ही 10,75,800/- असुन मक्ता तीन वर्षासाठी प्रती वर्ष 10 टक्के नैसर्गिक वाढ या प्रमाणे सदर मक्त्यामध्ये खालील ठेकेदारांनी भाग घेतला.

| अ.क्र. | लिलावधारकांचे नांव | बोली रक्कम रु. (लाखा मध्ये) |
|---|---|---|
| 01 | श्री मो. खालेद मो. इस्माईल | 6.20 हजार, 6.60 हजार |
| 02 | श्री स. शादुल्ला स. वारीस अली | 5 लाख, 5.10 हजार, 6.30 हजार, 6.70 हजार, 7 लाख |
| 03 | श्री मो. आसीफ मो. ईस्माईल | 5.20 हजार, 6 लाख, 6.90, 7.20 हजार |
| 04 | श्री म. शफीख अ. सत्तार | 5.50 हजार, 6.50 हजार, 6.80 हजार, 7.10 हजार |

वरील पैकी श्री मो. आसीफ मो. इस्माईल यांनी सर्वात जास्त बोली बोलुन रुपये 7,20,000/- बोली अंतीम आहे. त्यामळे सदरचा मक्ता देण्याबाबत महानगरपालिकेच्या आर्थीक हिताचा विचार करता सदरचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभे समोर निर्णयास्तव सादर.

**सभापती** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 101** **ठराव**

नावाशमनपा हद्दी मध्ये मध्यवर्ती बस स्थानका समोरील उड्डान पुलाखालील उत्तर बाजुचे वाहनतळ + उपहारगृह, नांदेड येथील वाहनतळाचा मक्ता तीन वर्षासाठी देणेसाठी एकूण 03 वेळेस ई-लिलाव निविदा मागविण्यता आल्या तसेच 02 वेळेस जाहिर लिलाव मागविण्यात आले होते परंतु प्रतिसाद मिळाला नाही.

तथापि दुसरी जाहिर लिलाव सुचना दिनांक 02.11.2018 रोजी दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करुन दिनांक 05.11.2018 रोजी मक्ताचा जाहिर लिलाव ठेवण्यात आला होता सदर मक्त्याची सरकारी बोली ही 10,75,800/- असुन मक्ता तीन वर्षासाठी प्रती वर्ष 10 टक्के नैसर्गिक वाढ या प्रमाणे सदर मक्त्यामध्ये खालील ठेकेदारांनी भाग घेतला.

| अ.क्र. | लिलावधारकांचे नांव | बोली रक्कम रु. (लाखा मध्ये) |
|---|---|---|
| 01 | श्री मो. खालेद मो. इस्माईल | 6.20 हजार, 6.60 हजार |
| 02 | श्री स. शादुल्ला स. वारीस अली | 5 लाख, 5.10 हजार, 6.30 हजार, 6.70 हजार, 7 लाख |
| 03 | श्री मो. आसीफ मो. ईस्माईल | 5.20 हजार, 6 लाख, 6.90, 7.20 हजार |
| 04 | श्री म. शफीख अ. सत्तार | 5.50 हजार, 6.50 हजार, 6.80 हजार, 7.10 हजार |

वरील पैकी श्री मो. आसीफ मो. इस्माईल यांची रुपये 7,20,000/- सर्वात जास्त बोली बोली असल्यामुळे मध्यवर्ती बस स्थानका समोरील उड्डान पुलाखालील उत्तर बाजुचे वाहनतळ + उपहारगृह, नांदेड येथील वाहनतळाचा मक्ता तीन वर्षासाठी देण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय** -

विषय :- नांदेड मनपा हद्यीतील तालुका क्रिडा संकुल सिडको नांदेड येथे (Balance work Compound Wall, Gate and GYM Building ) करणे रुपये 34,16,000/-

संदर्भ :- प्रशासकिय व आर्थीक मान्यता जा.मक्रं. 2017/नपाप्र/टे-6/मनपा/नगरोत्थान/सिआर- दि. 07.12.2017

नांदेड मनपा हद्यीतील तालुका क्रिडा संकुल सिडको नांदेड येथे (Balance work Compound Wall, Gate and GYM Building ) करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 34,16,000/- करिता दुस-यांदा ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/2834/2018 दिनांक 01.06.2018 अन्वये दैनिक सामना (राज्यस्तरीय)/ दैनिक श्रमिक एकजुट या वृत्तपत्रात दिनांक 02.06.2018 अन्वये ई टेंडरीग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 27.06.2018 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | 19.00% जास्त दर |
| 02 | स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | 21.00% जास्त दर |
| 03 | एल अन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड | 22.00% जास्त दर |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 19.00% जास्त दराची आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीत हे प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखी पत्र देवुन सदरचे काम अंदाजपत्रकिय दरापेक्षा 19.00% जास्त दराऐवजी 11.00% जास्त दराने करण्याची लेखी समंती दिली. सदरचे दर जिल्हा दरसुची 2017-18 नुसार अंदाजपत्रकीय दराची येत आहे. कंत्राटदाराने लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर कामासाठी प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.00% जास्त दराची निविदा मंजुरीस्तवचा प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर सादर.

**सभापती** प्रशासनाचा निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 102** **ठराव**

विषय :- नांदेड मनपा हद्यीतील तालुका क्रिडा संकुल सिडको नांदेड येथे (Balance work Compound Wall, Gate and GYM Building ) करणे रुपये 34,16,000/-

संदर्भ :- प्रशासकिय व आर्थीक मान्यता जा.मक्रं. 2017/नपाप्र/टे-6/मनपा/नगरोत्थान/सिआर- दि. 07.12.2017

नांदेड मनपा हद्यीतील तालुका क्रिडा संकुल सिडको नांदेड येथे (Balance work Compound Wall, Gate and GYM Building ) करणेसाठी संदर्भीय आदेशान्वये प्रशासकिय व आर्थीक मान्यता दिल्यानुसार रुपये 34,16,000/- करिता दुस-यांदा ई-निविदा सुचना जा.क्रं. नावाशमनपा/साबांवि/2834/2018 दिनांक 01.06.2018 अन्वये दैनिक सामना (राज्यस्तरीय)/ दैनिक श्रमिक एकजुट या वृत्तपत्रात दिनांक 02.06.2018 अन्वये ई टेंडरीग सेलव्दारे सदर कामासाठी निविदा प्रसिध्द केल्यानुसार एकूण 03 निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा त्रिसदस्यीय समितीसमोर दिनांक 27.06.2018 रोजी उघडण्यात आल्या असता त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | कंत्राटदाराने दिलेला दर |
|---|---|---|
| 01 | प्रविण कन्सट्रक्शन नांदेड | 19.00% जास्त दर |
| 02 | स्वान इन्फ्रास्ट्रक्चर नांदेड | 21.00% जास्त दर |
| 03 | एल अन्ड एस कन्सट्रक्शन नांदेड | 22.00% जास्त दर |

निविदा तुलनात्मक तक्त्यानुसार सर्वात कमी दराची निविदा प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची असुन जी अंदाजपत्रकिय दरापेक्षा 19.00% जास्त दराची आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने संबंधीतास दर कमी करण्यासाठी वाटाघाटी करिता पाचारण केले असता संबंधीत हे प्रत्यक्ष उपस्थित राहुन लेखी पत्र देवुन सदरचे काम अंदाजपत्रकिय दरापेक्षा 19.00% जास्त दराऐवजी 11.00% जास्त दराने करण्याची लेखी समंती दिली. सदरचे दर जिल्हा दरसुची 2017-18 नुसार अंदाजपत्रकीय दराची येत आहे. कंत्राटदाराने लेखी सहमती दिल्यानुसार वाटाघाटी अंती सदर कामासाठी प्रविण कन्सट्रक्शन नांदेड यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा 11.00% जास्त दराची निविदा हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो..

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.